# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क)** बुधवार, दिनांक १ जुलै, २०२६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.सुधाकर अडबाले व इतर वि.प.स. यांचा "राज्यातील अनुदानित दिव्यांग शाळा, वसतिगृहे व पुनर्वसन केंद्रांच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ९५२४.

**(ख)** तारांकित प्रश्न

**दोन कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**(१) उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री** : "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) खनिकर्म मंत्री** : **(क)** "जिल्हा खनिज प्रतिष्ठान ठाणे, पालघर, पुणे, सातारा, जालना, हिंगोली, वर्धा व रत्नागिरी या जिल्ह्यांचे सन २०२२-२०२३ ते सन २०२५-२०२६, जिल्हा खनिज प्रतिष्ठान रायगड व लातूर या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२४-२०२५, जिल्हा खनिज प्रतिष्ठान सिंधुदुर्ग, सांगली, सोलापूर, नंदुरबार, अहिल्यानगर, यवतमाळ व गोंदिया या जिल्ह्यांचे सन २०२३-२०२४ ते सन २०२५-२०२६, जिल्हा खनिज प्रतिष्ठान कोल्हापूर, परभणी, अकोला, अमरावती, नागपूर व गडचिरोली या जिल्ह्यांचे सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५, जिल्हा खनिज प्रतिष्ठान मुंबई उपनगर व नांदेड या जिल्ह्यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-

२०२४, जिल्हा खनिज प्रतिष्ठान चंद्रपूर व धाराशीव या जिल्ह्यांचे सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५, जिल्हा खनिज प्रतिष्ठान नाशिक जिल्ह्याचे सन २०२४-२०२५, जिल्हा खनिज प्रतिष्ठान भंडारा जिल्ह्याचे सन २०२४-२०२५ व सन २०२५-२०२६ तसेच जिल्हा खनिज प्रतिष्ठान बुलढाणा जिल्ह्याचे सन २०१६-२०१७ ते सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) कृषी मंत्री** : "डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(५) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** : **(क)** "महाराष्ट्रातील जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांचे सन २०१९-२०२० चे वार्षिक एकत्रित वित्तीय व महसूली लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "सन २०२१-२०२२ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील एकावन्नावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "सन २०२४-२०२५ चे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / पालघर / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव / अहिल्यानगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर /

कोल्हापूर / छत्रपती संभाजी नगर / जालना परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / धाराशीव / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६, सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ व मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने (अनुक्रमांक १ व २):-**

**(१) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

जिल्हा ग्रंथालय संघ, विभाग ग्रंथालय संघ व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ यांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत.

**(२) श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीतील कमालीची उदासीनता, नियमावलीचा अभाव आणि जिल्हास्तरीय समित्यांच्या रखडलेल्या नियुक्त्यांबाबत.

**(मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने (अनुक्रमांक ३ व ४):-**

**(३) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २१ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

वस्तू व सेवा कर (GST) लागू झाल्यानंतर स्थानिक संस्था कर (LBT)/जकात रद्द झाल्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेला मिळणाऱ्या जीएसटी अनुदानातील तफावत, आर्थिक अडचणी व अनुदान वाढविण्याबाबत.

**(४) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २० वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

नागपूर एम.आय.डी.सी.च्या क्षेत्रातील जमिनीचा मोबदला ठरविताना प्रोग्रेसिव्ह इंडेक्स व प्रत्यक्षातील विकासाचा, भौगोलिक परिस्थितीचा सकारात्मक विचार करुन सर्व गावांना एकच दर लागू करण्याबाबत.

**(५) श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २६ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील पोलीस भरती आणि सरळसेवा परीक्षांचे 'वार्षिक वेळापत्रक' (Annual Calendar) विनाविलंब जाहीर करून प्रलंबित असलेल्या सर्व विभागांतील पदभरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत.

**(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २७ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

पालघर जिल्ह्यातील विरार पूर्व शिरगांव, गडगापाडा येथील खाणीवर दिनांक १२ मे, २०२६ रोजी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या १० ते १२ व्यक्तींच्या टोळीने एका व्यक्तीची दगडाने निर्घृण हत्या केल्याबाबत.

**(७) श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २८ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

जळगाव जिल्ह्यातील फत्तेपूर पोलिस स्टेशन येथील देऊळगाव-कापूसवाडी रोडवर एका आदिवासी महिलेवर १५ जणांनी सामूहिक बलात्कार करुन त्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारित केल्याबाबत.

**(८) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १९ वर उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) निवेदन करतील :-**

वरळीतील प्रेमनगर-सिद्धार्थनगर (इंदिरानगर) SRA पुनर्विकास प्रकल्प तब्बल २७ वर्षांहून अधिक काळ प्रलंबित असल्याने हजारो रहिवाश्यांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याबाबत.

**(९) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २४ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील शालार्थ आय.डी. प्रकरणात शेकडो शिक्षकांचे माहे मार्च, २०२५ पासून थकीत असलेले वेतन देण्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ व मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] –**

**(१) सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील उपनगरातील प्रवाशांच्या सोयीसाठी आणि लोकल रेल्वेवरील ताण कमी करण्यासाठी गुंदवली (रेड लाईन-७) ते अंधेरी पश्चिम (येलो लाईन-२ए) अशी थेट मेट्रो सेवा सुरू करण्यात आली असणे, दिनांक ८ एप्रिल, २०२६ पासून गुंदवली ते काशीगाव (रेड लाईन) मेट्रो सेवा सुरू झाल्यापासून, अंधेरी पश्चिमेकडील आनंद नगर, कांदरपाडा, बोरीवली पश्चिम, शिंपोली, कांदिवली, मालाड पश्चिम, गोरेगाव पश्चिम, ओशिवरा व अंधेरी पश्चिम या भागांत जाणाऱ्या प्रवाशांना दहिसर पूर्व येथे उतरून दुसरी मेट्रो पकडावी लागत असणे, थेट सेवा बंद झाल्यामुळे प्रवाशांना दहिसर पूर्व येथे गाडी बदलावी लागत असून, यामुळे प्रवाशांचा दररोज सुमारे २० मिनिटांचा वेळ वाया जात आहे, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व नोकरदार वर्गाला नाहक मनस्ताप व त्रास सहन करावा लागत असणे, या दोन्ही मेट्रो लाईन्ससाठी थेट जोडणी करणाऱ्या स्वतंत्र मार्गिका उपलब्ध असतानाही, केवळ प्रशासकीय नियोजना अभावी या मार्गिकांचा योग्य वापर न करता थेट सेवा बंद ठेवण्यात आली असणे, त्यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, परिणामी पश्चिम उपनगरातील पूर्व आणि पश्चिम भागांना जोडणारा हा थेट प्रवास पुन्हा सुसह्य करण्यासाठी गुंदवली ते अंधेरी (पश्चिम) अशी थेट मेट्रो सेवा तातडीने पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) सर्वश्री सुनील कर्जतकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे व कोकण महसूल विभागातील लोणावळा, खंडाळा, महाबळेश्वर, माथेरान तसेच इतर गिरीस्थानांतील इको सेन्सिटीव्ह झोनमध्ये महसूल विभागामार्फत लीजहोल्ड/ भाडेकरार पध्दतीने विविध अटी व शर्तीवर जमिनी उपलब्ध करुन देण्यात येणे, मात्र अनेक ठिकाणी भाडेकरारातील अटींचे उल्लंघन करुन अनधिकृत बांधकामे करण्यात येणे, नियमबाह्य पध्दतीने वर्ग-२ जमिनींचे

वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्यात आल्याच्या गंभीर तक्रारी समोर येणे, याबाबत वन व पर्यावरण विभागानेही गंभीर आक्षेप नोंदविल्याचे समोर येणे, इको सेन्सिटीव्ह झोन समित्यांची स्थापना होऊनही त्याच्या बैठका होत नसणे, त्यामुळे या समित्या नव्याने स्थापन करुन समितीचे काम पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात यावे, यामुळे वन व पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन होत असून शासनाच्या महसूलाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, त्यामुळे तेथील जनतेत पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री सतिश चव्हाण, विक्रम काळे, सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा आकृतीबंध दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला असणे व तदनंतर सन २०२४ ला संच मान्यता निर्गमित केली असणे, सदरच्या संचमान्यतेप्रमाणे कनिष्ठ लिपिक, ग्रंथपाल व प्रयोग शाळा सहाय्यक या पदाची रिक्त पदाच्या ८० टक्के मर्यादित पद भरतीस मान्यता दिली असणे, त्यानंतर संस्थांनी आवश्यक त्या परवानग्या/मान्यता घेवून दिनांक ३१ मार्च, २०२५ पूर्वीच शिक्षकेत्तर पदाची पद भरती केली असणे, सदर पदभरती केलेल्या कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद प्रशासनाने वैयिक्तिक मान्यता दिलेल्या असणे व शालार्थ आयडी करीता उपसंचालक, शालेय शिक्षण यांचेकडे प्रस्ताव दाखल केले असणे, परंतु दिनांक २८ मे, २०२५ रोजीच्या पत्रकान्वये शिक्षण संचालक, पुणे यांनी पत्रात पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी देऊ नये असे नमूद केले असणे, परंतु संस्थांनी दिनांक २८ मे, २०२५ पूर्वीच भरती प्रक्रिया राबवली असल्याने त्यांना वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी देण्यात यावी व दिनांक २८ मे, २०२५ रोजीचे पत्रक तात्काळ रद्द करावे यासाठी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४)** **सर्वश्री अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, जयंत आसगावकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गडचिरोली जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या चामोर्शी औद्योगिक क्षेत्राकरिता चामोर्शी तालुक्यातील मौजा कोनसरी, मुधोली चक नं.२, १ जयरामपूर, सोमनपल्ली, पारडीदेव यांच्या खाजगी व शासकीय

जमिनीच्या भूसंपादनाची प्रक्रिया करण्याकरिता शेतकऱ्यांना सूचना प्राप्त झाल्या असणे, गडचिरोली जिल्हयातील विशेषतः अनुसूचित जमातीतील क्षेत्रातील ग्रामसभेला असलेले अधिकार तसेच पेसा कायदा सन १९९६ पासून लागू असूनही या कायद्यांतर्गत ग्रामसभेची संमती व मत विचारात घेणे आवश्यक असतानाही या कायद्याची नैसर्गिक न्यायानुसार अंमलबजावणी राज्य शासन करत नसल्यामुळे व तसेच वरील मौजा मधील ९६३ हेक्टर आर क्षेत्र अधिग्रहण विरोधात सर्व ग्रामपंचायतीने ठराव पारीत करुन या अधिग्रहणाला विरोध केला असणे, या क्षेत्रात पूर्णतः सर्व जमीन ओलीताखाली असून कापूस, धान, सोयाबीन, मिरची या पिकांची बारमाही शेती केली जात असणे, तसेच भाजीपाला व फळबागांची शेती करणारे शेतकरी पूर्णतः शेतीवर अवलंबून असणे, तेव्हा ग्रामस्थांची भावना लक्षात घेता चामोर्शी औद्योगिक क्षेत्रासाठी सुपीक जमीन न घेता वन विभागातील अन्य जमिनीचा निर्णय घेण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी "मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.०" अंतर्गत वीजखरेदी करार (Power Purchase Agreement) करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत MSEB Solar Agro Power Ltd. या संस्थेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे, सदर 1) M/s. Prabhu Agarwalla Construction Pvt. Ltd, 2) M/s. Om Yash Projects Ltd, 3) M/s. Integration Induction Power Ltd., 4) M/s. Onix Renewable Ltd, 5) M/s. Knockoff Energy Pvt.Ltd. या पाच कंपन्यांनी निविदा प्रक्रियेदरम्यान बोगस/अप्रमाणित बँक हमी सादर करुन शासनाची केलेली दिशाभूल, त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया व प्रकल्प अंमलबजावणी संशयास्पद ठरणे, यासंदर्भात निर्मलनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे दोषी कंपन्यांविरुध्द गुन्हे दाखल होणे, वास्तविक महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाच कंपन्यांविरुध्द गुन्हा दाखल होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात M/s. Prabhu Agarwalla Construction Pvt. Ltd, M/s. Om Yash Projects Limited या २ कंपन्यांविरुध्दच अधिक्षक अभियंता स्तरावर गुन्हा नोंद होणे व उर्वरित ३ कंपन्यांविरुध्द महावितरण कंपनीकडून कोणतीच कार्यवाही न करता त्यांना देण्यात आलेले अभय, संबंधित कंपन्यांन्या महावितरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे असलेले संगनमत, तसेच बॅकहमी पडताळणी पूर्ण होण्यापूर्वीच Power Purchase Agreement (PPA) नियमबाहय अंमलात आणणे, सहा महिन्यांत Financial Closure करणे बंधनकारक असताना अनेक प्रकरणांमध्ये १२ ते १४ महिन्यांचा अनुचित कालावधी देण्यात आला असणे, याकडे शासनाचे

होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यासंदर्भात लोकप्रतिनिधीनी दिनांक १६ एप्रिल, २०२६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केलेला पत्रव्यवहार, निविदा प्रक्रियेदरम्यान बोगस व अप्रमाणित बँक हमी देऊन शासनाची फसवणूक व दिशाभूल करुन कामे मिळविल्याप्रकरणी संपूर्ण निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाने तात्काळ गुन्हे शाखेकडून स्वतंत्र तपासणी करुन दोषी कंपन्या व संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करुन दोषी कंपन्यांना तात्काळ काळया यादीत टाकण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **सर्वश्री राजेंद्र राऊत, सुनील कर्जतकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सातारा जिल्ह्यामध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजना / मुख्यमंत्री सडक योजनेमध्ये विविध रस्त्यांच्या निकृष्ट कामांबाबत तक्रारी व निवेदने माहे मे-जून,२०२६ दरम्यान प्राप्त होणे, सदर रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची होवूनही संबंधित कामांची चौकशी होऊन, कंत्राटदारांवर अद्याप कारवाई न करणे, तसेच सातारा जिल्हा परिषदे मध्ये राज्य आपत्ती सौम्यीकरण निधी विमा आयोग अनिवार्य (२२४५-४२३२) ३१० या लेखाशीर्षखाली एकूण ०६ कामे मंजूर असणे, सदर कामांच्या निविदा दैनिक सकाळ आणि शासनाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणे, या निविदांनुसार कामांसाठी सर्वात कमी दराची निविदा स्विकृत होणे, शासनाच्या मान्यतेनंतर संबंधित कंत्राटदार यांनी सुरक्षा ठेव रक्कम व अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम शासनास भरल्याची बनावट चलने कार्यालयात सादर करणे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा यांनी जिल्हा परिषद, सातारा यांना याबाबतीत गोपनीय अहवाल सादर करणे, त्यामध्ये संबंधित कंत्राटदाराने बँकेचा बनावट शिक्का व डेटर, तसेच कैशियरची खोटी सही केल्याने, बनावट डी.डी. तयार केल्याचे आढळून येणे, ठेकेदारांनी अर्थिक फायद्याकरीता जाणीवपुर्वक जिल्हा परिषद, सातारा यांची फसवणुक करणे, शासनाची फसवणूक केल्यामुळे संबंधित ठेकेदारांविरूध्द स्थानिक पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल असणे, याप्रकरणाचा तपास धिम्या गतीने चालणे, संबंधित कंत्राटदार यांच्यावरील कारवाईसाठी दिरंगाई होणे, अशा परिस्थितीत जिल्हयामध्ये उक्त सर्व कंत्राटदारांचा अनिर्बंध वावर असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, यास्तव शासनाने करावयाची कार्यवाही, शासनाची व प्रतिक्रिया."

**(७)** **श्रीमती भावना गवळी,श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"स्वतंत्रपूर्व काळापासून सुरु असलेली शकुंतला ही रेल्वे सेवा विदर्भातील अमरावती जिल्ह्यातून अचलपूर ते यवतमाळ या मार्गावर धावत असणे, शकुंतला रेल्वेचा ग्रेट इंडिया पेनिन्सुला रेल्वे कंपनीने माहे डिसेंबर १९१३ मध्ये करार झालेला असून आज या गोष्टीला ११३ वर्षे पूर्ण होणे, तेव्हा पासून आजतागायत ही रेल्वे सेवा नॅरोगेज म्हणजेच अरुंद रूळावर धावत असल्याने तिच्या वेगाला मर्यादा येणे, त्यामुळे अनेकदा ठिकाणावर पोहोचण्यास उशीर होणे यासाठी नॅरोगेजचे रूपांतर ब्रॉडगेज मध्ये होण्यासाठी सन २०१० पासून केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु असणे, सद्य:स्थितीतीला शकुंतला रेल्वे सेवा बंद असून केंद्र शासनाकडून अचलपूर-मूर्तीजापूर या ७६.५ किमीचा DPR (DETAIL PROJECT REPORT) मंजूर असणे, मात्र अद्यापपर्यंत कामाला सुरुवात न झाल्याने नागरिकांना दळणवळणाच्या सुविधेमध्ये अडचणी निर्माण होणे, मंजूर असलेले काम लवकर सुरु होऊन शकुंतला रेल्वे सेवा पुन्हा जलत गतीने सुरु व्हावी, जेणे करून राज्यातील जनतेला त्याचा उपयोग होऊन उद्योगाला चालना मिळेल, ज्यामुळे विदर्भातील युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील, यावर शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(८)** **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयातील सेवानिवृत्त मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी खोटा व बनावट जन्म दाखला सादर करून, शासन सेवेत बेकायदेशीर दोन वर्ष वाढवून घेतली असून, सदर जन्म दाखला सादर करून वय वाढवून घेतलेले असणे, प्रशासकीय सेवेत असताना रुग्णालयाची गोपनीय माहिती त्रयस्थ व्यक्तीला देऊन खंडणी वसूल करण्याचे कारस्थान केले असणे आणि याप्रकरणी वागळे इस्टेट पोलीस स्टेशन, ठाणे मार्फत चौकशी होऊन त्यांच्यावर दोषारोप ठेवून अहवाल शासनास चौकशीसाठी सादर करण्यात आला असणे, निवृत्त मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी सेवा काळात गैरव्यवहार करणे, कर्मचाऱ्यांकडून बेकायदेशीर पैसे वसूल करणे यासारखे गंभीर आरोप सिद्ध झालेले असणे, बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक करणे, गोपनीय माहिती त्रयस्थ व्यक्तीस देऊन त्यांच्यामार्फत खंडणी वसूल करण्याचे कारस्थान व गैरव्यवहाराचे आरोप सिद्ध होऊनही संबंधित अधिकाऱ्यावर अद्यापही ठोस कार्यवाही झालेले नाही याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६, सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ व मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) (अनुक्रमांक १) :-**

(१) **श्री. विक्रांत पाटील,** श्रीमती उमा खापरे,श्री. प्रसाद लाड, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"पनवेल महानगरपालिका क्षेत्र सुमारे ११० चौ.कि.मी. असून वाढत्या लोकसंख्येनुसार पायाभूत सुविधांचे दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक असणे, शेलार धरण पूर्ण होईपर्यंत प्रलंबित पाणीपुरवठा योजना पूर्ण करून मोर्बे धरणातून अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध करुन देणे, वाढत्या वाहनसंख्येमुळे सिडकोमार्फत भूखंड उपलब्ध करून बहुमजली पार्किंग प्रकल्प उभारणे, पुढील वीस वर्षांचा विचार करून वीज वितरण व्यवस्था सक्षम करावी व वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणे, तळोजा एमआयडीसी परिसरातील औद्योगिक प्रदूषण रोखण्यासाठी सांडपाणी व विषारी रसायने सोडणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई करणे, डम्पिंग ग्राउंड नागरी वस्तीपासून दूर स्थलांतरित करून महानगरपालिकेचा स्वतंत्र कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे, खारघर, तळोजा, कामोठे व इतर भागांत अत्याधुनिक अग्निशमन केंद्रे सुरू करणे, सांस्कृतिक विकासासाठी नाट्यगृहे, कला दालने, प्रदर्शन केंद्रे व सांस्कृतिक कट्टे उभारणे, युवकांसाठी आधुनिक क्रीडासंकुले व नागरिकांसाठी अत्याधुनिक सार्वजनिक वाचनालये उभारणे, कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना ठोक मानधन, योग्य वेतन, पीएफ, ईएसआयसी व इतर वैधानिक लाभांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ व मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) (अनुक्रमांक २ व ३) :-**

(२) **श्री. अंबादास दानवे,** ॲड. अनिल परब, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"छत्रपती संभाजीनगर शहरातील नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असणे, शहराच्या पाणी प्रश्नाचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी हाती घेण्यात आलेली समांतर जलवाहिनी योजना सुमारे २५ वर्षांपासून विविध टप्प्यांमध्ये प्रलंबित असणे, या कालावधीत शासन व संबंधित यंत्रणांकडून योजनेच्या पूर्णत्वाबाबत वारंवार आश्वासने देण्यात आली, मुदतवाढी जाहीर करण्यात आल्या, आराखड्यात बदल करण्यात आले, मात्र

प्रत्यक्षात नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध झालेला नसणे, योजनेची कामे पूर्ण झाल्याचे दावे करण्यात येत असताना शहरातील अनेक भागांत अद्यापही वितरण जाळे, जलशुद्धीकरण केंद्र, पाईपलाईन जोडण्या, रस्त्यांची पुनर्बांधणी आदी कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी नागरिकांना आठ ते पंधरा दिवसांनी पाणी मिळत असून, उन्हाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर झालेली असणे, दुसरीकडे मराठवाड्यातील अनेक गावे व वाड्यांना शासनामार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असणे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर टँकर सुरू असल्याने जलव्यवस्थापनातील त्रुटी आणि नियोजनातील अपयश अधोरेखित होत असणे, सदर योजनेच्या विलंबामुळे प्रकल्प खर्चात किती वाढ झाली, संबंधित कंत्राटदारांवर अथवा अधिकाऱ्यांवर कोणती जबाबदारी निश्चित करण्यात आली, विलंबाबाबत कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली तसेच योजना पूर्ण होण्यासाठी निश्चित कालमर्यादा कोणती आहे, याबाबत जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, सदर बाब छत्रपती संभाजीनगर शहरातील लाखो नागरिकांच्या मूलभूत पिण्याच्या पाण्याच्या हक्काशी संबंधित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री श्रीकांत भारतीय,** अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"सध्या राज्यात संतपीठ हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एक विभाग म्हणून असणे, त्या ऐवजी संतपिठाला स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा मिळण्याची आवश्यकता असणे, तेथे घेण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाला सर्टिफिकेट कोर्स ऐवजी पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी असा दर्जा देण्याची आवश्यकता असणे, त्या अनुषंगाने निधी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची आवश्यकता असणे, संतपिठाच्या माध्यमातून युवकांमध्ये नैतिकता, समता, अध्यात्मिक आणि सामाजिक ऐक्याची मूल्य रुजविण्यासाठी विशेष कार्यक्रम आखण्याची आवश्यकता असणे, संतपिठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(४)** **सर्वश्री अरुण लखानी,** श्रीकांत भारतीय, विक्रांत पाटील, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यात पाण्याचे नियोजन वेगवेगळया खात्यातून होत असल्यामुळे एकसूत्रता निर्माण होणे गरजेचे असणे, राज्यात हवामान बदल, अनियमित पर्जन्यमान, भूजलपातळीतील सातत्याने होणारी घट, वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे जलसंकट अधिक तीव्र होणे, नद्या, तलाव आणि

विहिरीमध्ये तसेच गोड्या पाण्याच्या स्रोतांना दूषित पाणी मिसळून जलजन्य आजार निर्माण होत असून नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होत असणे, सूक्ष्म सिंचन, पीक नियोजन, भूजल व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे, यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA) सारख्या उपक्रमांना अधिक बळ देण्याची आवश्यकता असणे, शहरी भागातही सांडपाण्याचे शास्त्रीय प्रक्रियेद्वारे पुनर्वापर करणे अत्यंत आवश्यक असून नागपूर येथे प्रक्रियायुक्त सांडपाणी औष्णिक वीज प्रकल्पांना पुरविण्याचा यशस्वी प्रयोग झाल्याने त्याचप्रकारे हेच मॉडेल राज्यातील इतर महानगरांमध्ये आणि शहरांमध्येही व्यापक प्रमाणावर राबविणे गरजचे असणे, पाणी मीटरिंग आणि पाण्याच्या कार्यक्षम वापराला प्रोत्साहन देणारी दररचना यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम हाती घेणे आवश्यक असून केवळ पुरवठा वाढविण्यावर भर न देता मागणी व्यवस्थापनावर लक्ष देण्याची नितांत आवश्यकता असणे, त्याकरिता राज्यात जलविषयक उच्चस्तरीय तज्ज्ञ गट स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(५) **श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू,** डॉ.मनिषा कायंदे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यातील दिव्यांग, भिक्षेकरी, अनाथ मुले, एकल आणि विधवा महिला हे समाजातील वंचित घटक असून महागाईच्या भीषण तडाख्यातून त्यांना समाजाच्या मूळप्रवाहात आणण्याची संपूर्ण जबाबदारी शासनाने घेणे आवश्यक असणे, यासाठी शासकीय योजनांमध्ये क्रांतीकारी बदल करून गरजेनुसार नवीन योजना बनविण्याची वेळ आलेली असणे, दिव्यांग व्यक्तींना समाजात वावरण्यासाठी तसेच त्यांना सक्षम करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाच्या दृष्टीकोनात बदल करणे गरजेचे असणे, दिव्यांग विवाह योजना अद्ययावत करणे, अनाथ मुलांना प्रमाणपत्र मिळवण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी 'सिंगल विंडो क्लिअरन्स' उपलब्ध करून देणे, बालभिक्षेकरी ही एक संघटित गुन्हेगारी असून अशा टोळ्यांवर 'मोक्का' अंतर्गत कडक कारवाई करणे, राज्यातील गरजू, एकल व विधवा महिलांसाठी विशेष योजना राबवून अशा महिलांना सक्षम बनविण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : शासकीय विधेयके –**

**(क)** " सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२६" दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतच्या प्रस्तावास विधानपरिषदेच्या सहमतीसंबंधी विधानसभेकडून आलेला संदेश.

**(ख) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७ – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७ – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२६"

विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(४)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ - महाराष्ट्र सावकारी (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ - महाराष्ट्र सावकारी (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

(घ) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विधेयक विचारात घेणे :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ - महाराष्ट्र मुद्रांक (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६

**आठ : (मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६, रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री विक्रम काळे,** प्रविण दरेकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री प्रसाद लाड, हेमंत पाटील, पंकज भुजबळ, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, शिवाजीराव गर्जे, अमरिशभाई पटेल, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री संजय खोडके, प्रविण पोटे-पाटील, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री इद्रिस नायकवडी, राजहंस सिंह, कृपाल तुमाने, झीशान सिद्दिकी, डॉ. परिणय फुके, सर्वश्री किशोर दराडे, अनिकेत तटकरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, चंद्रकांत रघुवंशी, विक्रम काकडे, श्रीमती चित्रा वाघ, श्री. रविंद्र फाटक, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री दुष्यंत चतुर्वेदी, सदाशिव खोत, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, गोकुळ गीते, योगेश टिळेकर, वसंत खंडेलवाल, अमित गोरखे, सुनील कर्जतकर, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, प्रमोद जठार, श्रीमती माधवी नाईक, श्री. प्राजक्त तनपूरे, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री विवेक कोल्हे, संजय भेंडे, अरुण लखानी, अमरनाथ राजूरकर, राजेंद्र राऊत, अविनाश ब्राम्हणकर, धैर्यशील कदम, नंदकिशोर महाजन, सुहास शिरसाठ, बसवराज पाटील, डॉ. राजीव पोतदार, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्य शासनाने शैक्षणिक क्षेत्रात वेगवेगळया उपाययोजना हाती घेतल्या असणे, आरटीई कायद्याच्या अंमलबजावणीत सुसुत्रता आणण्याची आवश्यकता, नवीन संच मान्यतेच्या निकषामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर शिक्षक अतिरिक्त होणे, ऑनलाईन संचमान्यतेमुळे शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन रखडणे, पवित्र पोर्टल भरतीमध्ये शिक्षक मिळण्याच्या दृष्टीकोनातून सुधारणा आवश्यक असणे, इयत्ता ११ वी प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दत ठेवल्यामुळे डिसेंबर अखेरपर्यंत प्रवेश प्रक्रिया चालू राहिल्याचे निदर्शनास येणे, ईबीसी शुल्काचे दर अत्यंत तुटपुंजे असल्याने निधीअभावी विद्यार्थी अनेक शिष्यवृत्तीपासून वंचित राहणे, जिल्हापरिषद प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापक व शिक्षकांची पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार यांसारख्या सुविधा वेळेत मिळण्याची आवश्यकता, वेतनोत्तर अनुदान वेळेवर न मिळणे, "कायम" शब्द वगळल्यानंतर टप्पा अनुदान देताना प्रचलित धोरण मोडीत काढणे, २०%, ४०%, ६०% व ८०% अनुदान घेत असलेल्यांना पुढील टप्पा अनुदान देऊन सर्वांनाच १००% अनुदान देणे गरजेचे असणे, ज्या शाळांनी मूल्यांकनाचे निकष पूर्ण केले त्या व राहिलेल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना सुध्दा अनुदान देणे आवश्यक असणे, सन २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतु टप्पा अनुदान व विनाअनुदान शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना न्यायालयीन निर्णयाप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करणे गरजेचे असणे, संगणक

शिक्षकांना वेतन अनुदान सुरु करणे, शिक्षकेत्तर कर्मचारी भरती करणे गरजेचे असणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १०, २०, ३० ची वेतनश्रेणी लागू करणे, वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण पुर्वीप्रमाणे ऑनलाईनच करणे गरजेचे असणे, आदिवासी डोंगराळ भागात २०/३० विद्यार्थ्यांना एक तुकडी मंजूर करण्याची आवश्यकता, शाळांचे संचालन निकोप होण्यासाठी मंजूर अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरणे गरजेचे असणे, शाळांची, शिक्षक-कर्मचाऱ्यांची सर्व कार्यालयीन कामे जलदगतीने होण्यासाठी नवीन कार्यप्रणाली विकसित करणे गरजेचे असणे, पूर्णवेळ शिक्षकाला आठवडयाला १७ घड्याळी तास व अर्धवेळसाठी ८.३० तास कार्यभार ठेवण्याची आवश्यकता, सीबीएसई/आयसीएसई शाळांवर राज्य शासनाचे नियंत्रण गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **ॲड. अनिल परब, श्री अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"सन २०१३ मध्ये भंडारा शहरात मंजूर झालेल्या १०० खाटांच्या महिला रुग्णालयाच्या इमारतीकरिता आवश्यक असलेले साहित्य, उपकरणे व मशिनरी खरेदी करताना मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असणे, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी सदर रुग्णालयाकरिता आवश्यक साहित्यांच्या खरेदी निविदा प्रक्रियेत अनियमितता करुन अननुभवी मे.प्रिया कुलर इंडस्ट्रीज, भंडारा या पुरवठा धारकाला सदर कंत्राट दिले असून सदर पुरवठा धारकाने २८.५० कोटी रुपयांचे साहित्यांची खरेदी केवळ ४ ते ५ कोटी रुपयांमध्ये केलेली असणे, उक्त साहित्य खरेदी गुणवत्तेच्या निकषानुसार तसेच आवश्यक संख्येनुसार करण्यात आलेली नसून त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे, याबाबत चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **श्री. विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"पनवेल महानगर परिसरातील कामोठे, कळंबोली, खारघर व तळोजा परिसरात रोहित्र बिघाड, भूमिगत केबल दोष, वाढलेला विद्युतभार व वितरण यंत्रणेतील तांत्रिक अडचणींमुळे अनेक भागांमध्ये विद्युत पुरवठा खंडित होऊन पाणीपुरवठा यंत्रणा, उदवाहन सेवा, आरोग्यविषयक उपकरणे, इंटरनेट सेवा व

इतर अत्यावश्यक सुविधेवर त्याचा परिणाम होऊन नागरिकांची गैरसौय होत असणे तसेच वारंवार विद्युत खंडित होत असल्यामुळे व्यापारी व लघुउद्योजकांचे आर्थिक नुकसान होत असणे, सदर प्रकरणी वीज वितरण व्यवस्थेचे तांत्रिक लेखापरीक्षण करणे, नवीन उपकेंद्रे व अतिरिक्त रोहित्रे उभारणे, भूमिगत केबल यंत्रणा सक्षम करणे, दोष निवारणासाठी स्वतंत्र तातडीची यंत्रणा उभारणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ७ जुलै, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद**.**